तरुण भारत
Apla Nagpur | 2024-08-30 | Page- 3
epaper.tarunbharat.net

# वसतिगृहे प्रवेशासाठी १६ सप्टेंबरपर्यंत मुदतवाढ

◆ **नागपूर, २९ ऑगस्ट**

समाज कल्याण विभागाच्या अनुसूचित जाती मुला-मुलींसाठी असलेल्या नागपूर विभागातील ६ जिल्ह्यांतील एकूण ७० शासकीय वसतिगृहांमध्ये प्रवेशासाठी ऑनलाईन अर्ज सादर करण्याकरिता ३० ऑगस्ट अंतिम मुदत देण्यात आली होती. प्रवेशासाठी आता १६ सप्टेंबरपर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. व्यावसायिक अभ्यासक्रमांची प्रवेश प्रक्रिया अद्याप शैक्षणिक संस्था स्तरावरून पूर्ण न झाल्याने मागासवर्गीय विद्यार्थ्यांचे हित लक्षात घेत, तसेच कोणीही विद्यार्थी प्रवेशापासून वंचित राहू नये याकरिता ही मुदतवाढ देण्यात आली आहे. २०२४-२५ करिता व्यावसायिक अभ्यासक्रमांची ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया सुरू करण्यात आली असून, पोर्टलद्वारे विद्यार्थ्यांना ऑनलाईन अर्ज भरता येणार आहेत. शासकीय वसतिगृहांतील व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्रवेशास १६ सप्टेंबर २०२४ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. इच्छुक व पात्र लाभार्थ्यांनी नियोजित वेळेत संबंधित सहायक आयुक्त कार्यालयात अर्ज सादर करावे, असे आवाहन समाज कल्याण विभागाचे, प्रादेशिक उपायुक्त डॉ. सिद्धार्थ गायकवाड यांनी केले आहे.

◀*(तभा वृत्तसेवा)*

Powered by iDocuments